# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः02.01.2025** **वारःगुरुवार**

---

1. डाय अमोनियम फॉस्फेट-डीएपी खतांवर एकवेळच्या विशेष मदतीमध्ये वाढ करण्याचा केंद्राचा निर्णय. शेतकऱ्यांना 1 हजार 35 रुपयांत डीएपी खताची पिशवी मिळेल.
2. प्रधानमंत्री पीक विमा योजना आणि पुनर्रचित हवामान आधारित पीक विमा योजना पुढील आर्थिक वर्षातही सुरू राहणार
3. गडचिरोलीत 11 नक्षली मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शरण
4. नाशिक जिल्ह्यात भरते 365 दिवसांची शाळा. आणि
5. राज्यात दोन वेगवेगळ्या अपघातात 8 जण ठार.

**केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय**

केंद्रीय मंत्रिमंडळानं डाय-अमोनियम फॉस्फेट (डीएपी) खतांवरील एक-वेळचं विशेष पॅकेज प्रति मेट्रिक टन तीन हजार 500 रुपये पोषक तत्त्वावर आधारित अनुदानाच्या पुढे वाढवण्यास मंजुरी दिली आहे. यामुळं शेतकऱ्यांना परवडणाऱ्या किंमतीत डीएपीची उपलब्धता सुनिश्चित होईल. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती देताना सांगितलं की, या निर्णयामुळे केंद्र सरकारवर अंदाजे 3,850 कोटी रुपयांचा अतिरिक्त ओझं पडणार आहे. मंत्रिमंडळानं प्रधानमंत्री पिक विमा योजना आणि पुनर्रचित हवामान आधारित पीक विमा योजना पुढील आर्थिक वर्षातही सुरू ठेवण्याचा निर्णय घेतल्याचंही वैष्णव यांनी सांगितलं. या योजनेंतर्गत विमा उतरवलेल्या शेतकऱ्यांपैकी 88 टक्के शेतकरी अल्पभूधारक आहेत. गेल्या आठ वर्षात शेतकऱ्यांना विमा योजनेंतर्गत 1 लाख 70 हजार कोटी रुपये देण्यात आले आहेत.

**सदस्यत्व**

सरकारनं कालपासून वन नेशन वन सबस्क्रिप्शन-ONOS योजना सुरु केली. सरकारी अनुदानित उच्च शिक्षण संस्थांमधील 1 कोटी 80 लाख विद्यार्थ्यांना जगभरातील प्रमुख पत्रिकांमध्ये प्रकाशित होणारे शोधनिबंध पाहण्याची सुविधा मिळणार आहे.

**नक्षली समर्पण-गडचिरोली**

गडचिरोली इथं विमला सिडाम उर्फ तारक्का हिच्यासह 11 नक्षल्यांनी काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शरणागती पत्करली. तारक्का मागील 38 वर्षांपासून नक्षल चळवळीत होती. संविधानविरोधी आणि देशविरोधी कृत्यामुळे आपला विकास होत नाही हे नक्षल्यांच्या लक्षात आल्यामुळे अनेक जण देशाची व्यवस्था आणि संविधानावर विश्वास ठेवून मुख्य प्रवाहात येत आहेत असं फडणवीस यावेळी म्हणाले. याप्रसंगी उल्लेखनीय कामगिरी करणारे पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. फडणवीस यांनी भामरागड तालुक्यातील पेनगुंडा आणि एटापल्ली तालुक्यातील गर्देवाडा या नक्षलग्रस्त पोलिस मदत केंद्रांना भेट देऊन पाहणी केली. शिवाय सर्वसामान्य लोक आणि जवानांसोबत संवाद साधला. गर्देवाडा इथं स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच सुरु झालेल्या एसटीचा शुभारंभही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला.

**<u>शेलार</u>**

उद्योग, व्यवसाय आणि प्रशासनाचे भविष्य घडवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या महत्त्वावर जोर देऊन आणि त्यातील परिवर्तनीय क्षमता ओळखून राज्याचे पहिले स्वतंत्र कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण तयार करण्याचे निर्देश माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी दिले आहेत. तंत्रज्ञानाच्या भविष्याचा स्वीकार करण्याच्या दिशेने शेलार यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या बैठकीत त्यांनी हे निर्देश दिले.

**<u>भीमा कोरेगाव</u>**

पुण्याजवळ कोरेगाव भीमा या ठिकाणी काल दोनशे सातव्या शौर्य दिनानिमित्त विजयस्तंभाचं दर्शन घेण्यासाठी अनुयायांनी देशभरातून मोठी गर्दी केली होती. हा विजयस्तंभ हे एक प्रेरणास्थान असल्याचं क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांनी म्हटलं आहे. सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनीही विजयस्तंभाला अभिवादन केलं. या ठिकाणी प्रशासनाकडून चांगल्या प्रकारच्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

**<u>तिकीटं</u>**

नवी दिल्लीतील प्रजासत्ताक दिन संचलन आणि बीटिंग रिट्रीटसाठी तिकिटांची विक्री आजपासून सुरू होत आहे. सर्वसामान्य लोक aamantran.mod.gov.in आणि Aamantran मोबाइल ॲपवरून थेट तिकिटं खरेदी करू शकतात. संचलनासाठी तिकिटांची किंमत 20 ते 100 रुपयांदरम्यान आहे, तर बीटिंग रिट्रीट रिहर्सलसाठी 20 रुपये आहे.

**<u>हिवाळी शाळा-नाशिक</u>**

भविष्यातील उत्तम नागरिक घडविण्याच्या उद्देशाने शिक्षक सतत कार्यरत असतात. असेच एक शिक्षक आहेत केशव चंदर गावीत. गावीत यांच्या मेहनतीने नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर तालुक्यात दुर्गम भागात असलेली एक शाळा वर्षाचे 365 दिवस सुरू असते. याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

**या शाळेत मुलं एकही दिवस सुटी न घेता ते ही सकाळी 8 ते रात्री 8 वाजेपर्यंत आवडीने शिक्षण घेतात. इतकेच नव्हे तर बालवाडी आणि पहिलीच्या मुलांचे 1 ते 70 पर्यंत पाढे पाठ आहेत. तर मोठ्या वर्गातील मुलांचे 1100 पर्यंतचे पाढे पाठ आहेत. या मुलांचा अभ्यास इतका पक्का आहे की, त्यांना राज्य घटनेतील सर्व कलमे पाठ आहेत. मोठी मुले छोट्या मुलांच्या वर्गांवर देखील शिकवतात. इतकेच नव्हेतर दोन हातांनी दोन वेगवेगळ्या विषयांवर लिखाण करू शकतात. सोबत मुलांना वेल्डींग, शिवणकाम, गवंडी काम, शेतीकामही शिकवले जाते. ही मुलं स्वत: शेती करतात. भाजीपाला पिकवून त्याचाच आहारही करतात. आकाशवाणी बातम्यांसाठी संजय पाठक, नाशिक.**

**<u>जांभेकर विद्यालय-रत्नागिरी</u>**

रत्नागिरीतल्या गोदूताई जांभेकर विद्यालयाला शंभर वर्षं पूर्ण झाल्यानिमित्त केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांच्या उपस्थितीत शताब्दी महोत्सवाचं उद्घाटन करण्यात आलं. कोकणात स्त्री-शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या या संस्थेविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

**स्त्री-शिक्षण हा विषय क्रांतिकारी असण्याच्या काळात जनार्दन तथा बाबूराव जोशी आणि मालतीबाई या दाम्पत्याने रत्नागिरीत तीन मुलींसह महिला विद्यालयाचं बीज रोवलं. हालअपेष्टा सोसून त्यांनी घेतलेले अपार कष्ट आणि दूरदृष्टी यांमुळे या बीजाचा आज वटवृक्ष झाला आहे.1933 साली यातूनच रत्नागिरी एज्युकेशन**

**सोसायटीची स्थापना झाली. रूढ शिक्षणाबरोबरच संगीत, चित्रकला, शिवणकला, गृहशास्त्र असं वैविध्यपूर्ण शिक्षण या शाळेतून दिलं गेलं. प्रौढ निराधार, परित्यक्ता आणि विधवा स्त्रियांसाठीही वर्ग सुरू करण्यात आले. 1964 साली मालतीबाईंना तत्कालीन राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते गौरवण्यात आलं. शंभर वर्षांत 15 हजारांहून अधिक विद्यार्थिनी या शाळेने घडवल्या आहेत. या कार्याचा विस्तार आज रत्नागिरी एज्युकेशन सोसायटीच्या 22 शिक्षणसंस्थांच्या माध्यमातून होत आहे. 1973 साली गोदूताई जांभेकर यांचं नाव शाळेला देण्यात आलं. 'जोशी दाम्पत्यासारख्या निःस्वार्थी आणि त्यागी कार्यकर्त्यांमुळे स्वराज्याचं सुराज्य बनेल,' असे गौरवोद्गार तत्कालीन लोकसभाध्यक्ष गणेश मावळणकर यांनी संस्थेच्या रौप्यमहोत्सवावेळी काढले होते. ते आता सत्यात उतरल्याचं पाहायला मिळत आहे, असं प्रतिपादन संस्थेचे विद्यमान अध्यक्ष आणि केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी शताब्दी महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी काढले. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, अनिकेत कोनकर, रत्नागिरी.**

**सौरकृषि-जालना**

जालना जिल्ह्याच्या बदनापूर तालुक्यात केळीगव्हाण इथं मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात उभारण्यात आलेला सौर ऊर्जा प्रकल्प काल कार्यान्वित करण्यात आला. या प्रकल्पातून निर्माण होणारी वीज महावितरणच्या उपकेंद्रांतील फिडरद्वारे परिसरातल्या कृषिपंपांना दिवसा पुरवण्यात येत आहे. 5 मेगावॅट क्षमतेच्या या सौर ऊर्जा प्रकल्पातून परिसरातील 6 गावांतील अकराशे कृषिपंपांना दिवसा वीजपुरवठा केला जाणार आहे.

**भरडधान्य**

राज्यात भरड धान्य खरेदीअंतर्गत किमान आधारभूत किंमत खरेदीसाठी ऑनलाईन शेतकरी नोंदणीची मुदत येत्या 15 जानेवारीपर्यंत वाढवण्यात आली आहे. त्यामुळं सर्व धान उत्पादक शेतकऱ्यांनी लवकरात लवकर नजीकच्या केंद्रामधून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी असं आवाहन अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षणमंत्री धनंजय मुंडे यांनी केलं आहे.

**वाचन**

राज्यात 15 जानेवारीपर्यंत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. या अंतर्गत हिंगोलीच्या शासकीय जिल्हा ग्रंथालयात वाचन कौशल्य कार्यशाळा, सामूहिक वाचन आणि ग्रंथ प्रदर्शनाचं आयोजन काल करण्यात आलं होतं. नागपूर, सांगली, मुंबई विद्यापीठ इथंही या उपक्रमाला सुरुवात झाली आहे.

**विदर्भ साहित्यसंघ पुरस्कार**

विदर्भ साहित्य संघाच्या वतीनं दिल्या जाणाऱ्या वाङ्मय पुरस्कारांची काल घोषणा करण्यात आली आहे. 14 जानेवारीला विदर्भ साहित्य संघाच्या वर्धापन दिन समारंभात पुरस्कार हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

**अभाविप-लातूर**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या देवगिरी प्रदेशाचं 59 वं प्रदेश अधिवेशन आजपासून 4 जानेवारीपर्यंत लातूर इथं होणार आहे. राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते या अधिवेशनाचं उद्घाटन होणार आहे.

**अपघात-सोलापूर, जालना**

सोलापूर जिल्ह्यात अक्कलकोटमधील मैंदर्गी इथं काल मालगाडी आणि चारचाकी वाहन यांच्यात झालेल्या अपघातात 4 जण ठार झाले तर काहीजण गंभीर जखमी झाले आहेत. मृतांमध्ये नांदेड जिल्ह्यातील दोन महीला आणि दोन पुरुषांचा समावेश आहे.

अन्य एका अपघातात धुळे-सोलापूर महामार्गावर जालना जिल्ह्यातल्या महाकाळा फाट्यावर रस्त्यावर उभ्या असलेल्या नादुरुस्त मालवाहू गाडीला चारचाकी वाहनानं पाठीमागून धडक दिल्यामुळं एकाच कुटुंबातल्या चौघांचा मृत्यू झाला, तर दोघेजण गंभीर जखमी झाले. हे दोन्ही अपघात देवदर्शनाच्या प्रवासादरम्यान घडले असल्याचं आमच्या बातमीदारांनी म्हटलं आहे.

**निधन**

किनवट मतदारसंघाचे माजी आमदार प्रदीप नाईक यांचं काल हृदयविकाराच्या झटक्यानं हैदराबाद इथं निधन झालं. ते 69 वर्षांचे होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नाईक यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त करुन त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

**क्रिकेट**

पुण्यात महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या गाहुंजे इथल्या मैदानावर 19 वर्षाखालील गटाच्या कूंच बिहार चषक कसोटी उपांत्य सामन्यात काल तमिळनाडू संघानं दीडशे धावांची आघाडी घेतली आहे. महाराष्ट्राच्या 306 धावांना उत्तर देताना तमिळनाडू संघ राघव के. व्ही याच्या 182 तडाखेबंद धावांमुळे नऊ बाद 456 धावांपर्यंत पोहोचला. आज सामन्याचा शेवटचा दिवस आहे.

**हवामान**

राज्याच्या बहुतांश भागांमध्ये किमान तापमान सरासरी 15 अंशांच्या वर आहे. आज सर्वत्र हवामान कोरडं, सूर्यप्रकाशयुक्त राहण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.